# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 18.02.2013 (का.प.क्र.27) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक 18/02/2013 (का.प.क्र.27) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दूपारी 01.45 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा शहर अभियंता श्री.एम.डी.सोनवणे, विधी सहाय्यक तथा प्र.नगर सचिव, श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत।
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
06. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
07. स. श्री. खान अक्रम करीम खान
08. स. श्री.समिर सुभाष राजुरकर

**चर्चा :**

| | |
|---|---|
| श्री.रेणुकादास वैद्य | :जेष्ठ नेते श्री.दत्ताजी नलावडे यांनी आयुष्यभर कामगारांसाठी गरीब जनतेसाठी काम केलेले आहे त्यांचे दु:खद निधन झालेले आहे सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली वाहण्यात यावी. |
| श्री.गिरजाराम हाळनोर | :अनुमोदन देण्यात येते.<br>(दोन मिनंट स्तब्ध उभे राहुन सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहण्यात येते.) |
| श्री.रेणुकादास वैद्य | :सभापती असतांना तत्कालिन आयुक्तांनी ई-टेंडरींग पध्दत सर्व प्रथम सुरू केली त्यामाध्यमातुन मनपास फायदा झालेला आहे. त्यानंतर राज्यानी ई टेंडरींगची सुरूवात केली. ई.टेंडरींग करण्याचा हेतु हा निवीदेमध्ये पारदर्शीपणा असावा हा उद्देश होता. सदरील विभागामध्ये वाईट प्रकार सुरू झालेले आहे एखादे टेंडर भरल्यानंतर प्रेमाने, दादागिरी करून, मॅनेजकरून Not Open असे लिहीले जाते. ज्या दिवशी निवीदा भरले जाते त्या दिवशीच निवीदा उघडली गेली पाहीजे परंतु आठ ते दहा दिवसांनंतर निवीदा उघडण्यात येते. ज्या टेंडरधारकाने निवीदा भरली जाते आठ दिवसानंतर क्षमता नाही, घरगुती कामामुळे काम करता येत नाही असे सांगीतले जाते. Not Open करून एक प्रकारे रिंगच केली जाते. Not Open लिहुन देईल अशा कंत्राटदाराची इएमडी जप्त करून त्यास ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. निविदे प्रक्रीयेमध्ये भाग घेतल्यास अशा पध्दतीने माघार घेणे योग्य नाही. वेगळया पध्दतीने जी रिंग चालु आहे ती बंद करण्यात यावी. |
| शहर अभियंता | :जे प्रश्न उपस्थित केलेला आहे तो योग्य आहे. ई टेंडरींग |

**प्रणालीमध्ये हे सर्व बसत नाही. ज्या दिवशी टेंडर बंद होईल त्या दिवशी ॲटो ओपन होईल अशी पध्दत अवलंब करण्यात येणार आहे.**

**श्री.गिरजाराम हाळनोर** :वर्तमानपत्रामध्ये भोगवटा प्रमाणपत्र देणाऱ्या विभागाकडुन आणि एलबीटी विभागाकडुन वेगवेगळया प्रकारची माहिती समोर आलेली आहे. एलबीटी विभागाकडुन वसुलीचे वेगळे आकडे येतात दोन्ही विभागांमध्ये समन्वय नाही का?

**एलबीटी अधिकारी (श्री.पाटणी)**:एलबीटी विभागाअंतर्गत जे अर्ज येतात त्यांची नोंदणी करण्यात येऊन प्रमाणपत्र दिले जाते तसेच कर्मचाऱ्यांच्या पहाणी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र दिले जाते. आयात मालावर एलबीटी भरली जाते. ज्या ठिकाणी ना हरकत विचारले जाते त्या ठिकाणी तपासणी करून रेकॉर्ड नसेल तर दिनांक 6 ऑगष्ट 2012 रोजी काढलेल्या शासन निर्णय प्रती स्के.मी.प्रमाणे ठोस रक्कमेच्या पर्यायाअंतर्गत रक्कम भरुन घेतली जाते. रेती खडी,सिमेंट, स्टिल यावर वेगवेगळा रेट आहे.

**मा.सभापती** :रजिष्ट्रेशन किती झालेले आहे.

**एलबीटी अधिकारी (श्री.पाटणी)**:94 बिल्डर आणि 517 खाजगी बांधकामधारक आहेत.

**श्री.रेणुकादास वैद्य** :नगर रचना विभागात एलबीटीचा कर्मचारी बसविण्यात यावा म्हणुन सूचीत केले होते. परवानगीच्या वेळेस आलेल्या व्यक्तीचे रजिष्ट्रेशन होईल भोगवटाच्या वेळेस त्यांचेकडुन नियमानुसार रक्कम वसुल करू शकतो. एलबीटी विभागास कल्पना नसते की, किती परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र दिले. नगर रचना विभागाने परवानगीची एक कॉपी एलबीटी विभागास पाठविल्यास एलबीटी आकारणी करण्यास मदत होईल.

**एलबीटी अधिकारी (श्री.पाटणी)**:बांधकामाचे रेकॉर्डस् मागविले जातात. रिटर्नस् तपासले जातात.

**मा.सभापती** :नगर रचना विभागाने, गुंठेवारी विभागाने सर्व परवानगीची/भोगवटा प्रमाणपत्राची प्रत एलबीटी विभागास देण्यात यावे त्या आधारे रजिष्ट्रेशन करून वसुली करण्यात यावी.

**श्री.रेणुकादास वैद्य** :मोबाईल व्हाऊचर, लॉटरीवर एलबीटी लागु करण्यासाठी एलबीटी विभागाने काय कार्यवाही केली. खुलासा करण्यात यावा.

**मा.सभापती** :खुलासा करण्यात यावा.

**एलबीटी अधिकारी (श्री.पाटणी)**:संबधीत लॉटरी व्यवसायीक व कंपणी यांना नोटीसा देण्यात आल्या होत्या. नोटीसा अंतर्गत कंपणीने निवेदन दिले होते त्यानुसार सुनावणी घेण्यात आली. झालेली सुनावणी, आलेले निवेदन याबाबतीत मा.आयुक्तांकडे चर्चा करण्यात आली. चर्चे अंतर्गत तीन बाबी समोर आलेल्या आहेत 1. जकात कर प्रणाली असतांना ज्या काही वस्तुंवर जकात कर होता व ज्या टक्केवारीने होता त्याच वस्तुवर आणि त्याच दराने एलबीटी वसुली करण्याचे शासनाचे निर्देश होते. 2.शासन निर्णयात माल या संज्ञेत लॉटरी याचा समावेश केलेला नव्हता. आयात मालावर एलबीटी आकारण्यात येते. ॲक्टमध्ये प्रोव्हीजन आहे. तो एक मुद्दा 3. करंसी, लॉटरी तिकीट, पोस्ट कार्ड यास शासनाने कर माफी दिली होती त्यानुषंगाने व इतर महापालिकेत लॉटरी टिकीटावर घेण्यात एलबीटी येत नाही. असा एकंदरीत प्रस्ताव शासनास पाठविण्यात आलेला आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :शासनाचा निर्णय काय आलेला आहे.

एलबीटी अधिकारी (श्री.पाटणी) :निर्णय आलेला नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर :प्रशासन महानगरपालिकेच्या हिताचे करणार आहे की, व्यवसायीकांचे हित साधणार आहे.

मा.सभापती :स्थायी समितीने प्रशासनास वेळोवेळी लॉटरी व्यवसायावर एलबीटी लागू करण्याबाबत आदेशित केलेले आहे. प्रशासनाकडुन वेळोवेळी रजिष्ट्रेशन करू म्हणुन सांगण्यात आले. एकीकडे प्रशासन ही बाजु सांगत असतांना दुसऱ्या बाजुने एलबीटी माफीसाठी शासनाकडे पाठविण्यात आले.

एलबीटी अधिकारी (श्री.पाटणी) :आलेले निवेदन आणि घेतलेली सुनावणी यासंदर्भात निर्णय घेतलेला आहे.

मा.सभापती :सभागृहापुढे हा विषय का ठेवण्यात आला नाही. प्रशासन रजिष्ट्रेशन करण्यासाठी लॉटरी व्यवसायीकांना वेळ देण्यात येतो तसेच अचानक प्रशासनकडुन माहिती देण्यात येते की, शासनाकडे एलबीटी माफीसाठी पाठविण्यात आले.

एलबीटी अधिकारी(श्री.पाटणी):मा.आयुक्तांशी याबाबतीत चर्चा झाली होती चर्चेच्या अनुषंगाने शासनास पाठविण्यात आले आहे. मा.आयुक्त साहेबांचा निर्णय आहे.

मा.सभापती :यास माफी करावी म्हणुन सादर कुणी केले होते.

एलबीटी अधिकारी (श्री.पाटणी):सुनावणीचे वेळी झालेल्या चर्चेच्या अनुषांगाने व प्राप्त झालेल्या निवेदनानुसार नोटींग मा.आयुक्त साहेबांकडे सादर करण्यात आली होती.

मा.सभापती :शासनाकडुन आलेल्या शासन निर्णयात लॉटरी याचा उल्लेख आहे किंवा नाही.

एलबीटी अधिकारी (श्री.पाटणी):शेडयुलमध्ये उल्लेख आहे. दरसुचीमध्ये लॉटरीवर 2 टक्के एलबीटी आहे.

मा.सभापती :याच आधारावर सर्व वस्तुंवर एलबीटी लावण्यात येते. मग एका वस्तुवर एलबीटी लागु करायची आणि एका वस्तुवर करायची नाही. सर्वच वस्तुंवर माफी देण्यात यावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :आम्हीही निवेदने देतो त्या वस्तुंवर एलबीटी माफी देण्यात यावी.

एलबीटी अधिकारी (श्री.पाटणी):प्रशासनाचा निर्णय सभेमध्ये मांडत आहे.

मा.सभापती :प्रशासन म्हणुन आपण खुलासा करत आहात परंतु हे योग्य आहे का? महानगरपालिकेचा रिव्हेन्यु कमी करणे योग्य आहे का?

एलबीटी अधिकारी (श्री.पाटणी):मा.आयुक्त महोदयांचा निर्णय शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

मा.सभापती :पैसा नाही म्हणुन नगरसेवकांच्या कामांना मंजूरी मिळत नाही व एकीकडे महानगरपालिकेचा रिव्हेन्यु प्रशासन कमी करत आहे. एलबीटी कर न आकारण्याबाबतचा निर्णय रद्द करण्यात येत आहे. प्रशासनाने शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव रद्द करण्यात येतो. याबाबत प्रशासनाने लॉटरी व्यवसायावर एलबीटी माफ करावी म्हणुन शासनास पाठविलेले पत्र रद्द करण्याचा निर्णय स्थायी समितीने घेतलेला आहे. त्या संदर्भात शासनास ताबडतोब कळविण्यांत यावे. सात दिवसात लॉटरी व्यवसायीकांचे एलबीटी

**रजिष्ट्रेशन करण्याची कार्यवाही करण्यात यावी. सदर निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करावी.**

**श्री.रेणुकादास वैद्य** **:श्रीमती संगीता नवनाथ मोरे याचे 20X30चे गुंठेवारीचे घर आहे.1,81,993/- टॅक्स लावण्यात आलेला आहे. बाजुच्या घरास 1197 रूपये टॅक्स लागलेला आहे.**

**करमुल्य नि.व सं.** **:टॅक्स जास्तीचा लागलेला आहे. सन 2001 पासूनचा टॅक्स लागलेला आहे. मा.आयुक्तांनी टॅक्सच्या समस्येसाठी कमिटी स्थापन करणार आहे त्यात हे प्रकरण ठेवले जाणार आहे.**

**मा.सभापती** **:प्रशासनाने सदरील बाबतीत प्रकरण पुटअप करून मा.आयुक्तांची मंजूरी घेऊन प्रकरण निकाली काढावे.**

**श्रीमती प्राजक्ता राजपुत** **:16 फेब्रुवारी रोजीच्या सांजवार्तामध्ये बायोवेस्ट बाबत बातमी आलेली आहे की, ठेकेदाराने 25 लाखाचा चुना लावला याबाबत खुलासा करण्यात यावा. तसेच शहरातील एकुण रूग्णलयांची संख्या, रूग्णालयातील खाटांची संख्या, बायो मेडीकल वेस्टच्या संकलनातुन मनपास वसुली किती होती, कुठला ठेकेदार कुठल्या पध्दतीने वसुली करतो, बायो मेडीकल वेस्टच्या संदर्भात झालेल्या कराराची लेखी माहीती देण्यात यावी.**

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी** **: बायोवेस्ट प्रकल्प सन 2003 पासून सुरू केलेला होता. सर्वसाधारण सभेने दर मंजूर केलेले आहे. 808 सदस्य आहेत.**
**1 ते 4 खाटाचे 242 क्लिनिक, डेंटल क्लिनिक 60, दवाखाने 268, पॅथॉलॉजी लॅब 56, 239 नर्सिंग होम, 51 ते 200 खाटाचे 51 नर्सिंग होम आहेत. घाटीच्या 1000 खाटांचे सर्वात मोठे मेंबर आहेत. सन 2007 पुर्वी महानगरपालिकेकडे वसुली होती. सन 2007 पासून वसुली ठेकेदाराकडे दिलेली आहे. अपेक्षेप्रमाणे वसुली कमी जमा झालेली आहे. याबाबतीत नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.**

**मा.सभापती** **:स.सदस्यांनी विचारलेली माहिती लेखी स्वरूपात देण्यात यावी. दिल्लीगेट येथील अतिक्रमणबाबत खुलासा करण्यात यावा.**

**प्रशासकीय अधिकारी** **:मा.न्यायालयाने प्रकरणात कुठलाही हस्पक्षेप करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच स्टेटबँक कॉलनीतील अतिक्रमणाबाबत सिडकोकडुन भुखंडाचे कागदपत्र मिळविले असुन संबधीतास अतिक्रमण काढण्याबाबत नोटीस दिलेली आहे.**

**मा.सभापती** **:20 तारखेला मा.न्यायालयाची तारीख ठेवलेली आहे. त्यानंतर कार्यवाही करण्यात यावी.**

**श्री.रेणुकादास वैद्य** **:प्राणिसंग्रहालयात पांढरे मोरांचा मृत्यु झाल्याची बातमी वर्तमानपत्रामध्ये आलेली आहे माहिती देण्यात यावी.**

**संचालक,प्राणिसंग्रहालय** **:इंदोर प्राणिसंग्रहालयातुन दिनांक 09.08.2011 रोजी पांढऱ्या मोरांची जोडी आणण्यात आली होती. 13 डिसेंबर रोजी एक मोर आजारी पडला त्यास खडकेश्वर येथील पॉलिक्लिनिकच्या डॉक्टरांना बोलावण्यात आले होते. तसेच इंदुर येथील झु संचालक यांचेकडुन मार्गदर्शन घेण्यात आले होते. मा.आयुक्तांना याबाबत माहिती देण्यात आली होती. 8 जानेवारी रोजी इनोसायनोआयअीस्ट**

(व्हायरल इन्फेंक्शन) या आजाराने त्याचा मृत्यु झालेला आहे असे निष्पन्न झाले आहे. यापूर्वी प्राणिसंग्रहालयातील फक्त शेडयुल एक मधील दुर्मिळ व नष्ट होत चाललेल्या प्रजातीचे जन्म-मृत्यु, प्राण्यांचे अदला-बदली बाबत स्थानिक वन विभाग व मनपाचे पदाधिकाऱ्यांना कळविण्यात येत होते. आता यापुढे प्राणिसंग्रहालयात मृत पावलेल्या प्रत्येक प्राण्याची माहिती सन्मानीय पदाधिकारी यांना देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. प्राणि संग्रहालयात काही रिक्त पदे भरने आवश्यक आहेत. प्राणिसंग्रहालयात रोज सकाळी वैद्यकीय तपासणीसाठी राऊंड घेण्यात येतो 180 प्राण्यांपैकी काही किरकोळ आजाराने प्राणी त्रस्त असतात त्यांचेवर उपचार केले जातात. सध्या एक सिहींन, हरीन, सांभार किरकोळ आजाराने ग्रस्त आहेत.

मा.सभापती :यापुढे प्रशासनाने काळजी घेण्यात यावी व प्रशासनाला याबाबत यापुढे माहिती देण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :आस्थापना -2 विभागास लागलेल्या आगीची घटना घडल्यानंतर मनपा इमारतींना फायरसेफ्टी यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी आदेशित केले होते. माहिती देण्यात यावी.

शहर अभियंता :याबाबतीत प्रपोजल तयार करण्यात आलेले आहे. पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.मोहन मेघावाले :STP प्लॅन्टबाबत सभेत माहिती विचारणा केली असता थोडयाफार प्रमाणात काम केले जाते व पुन्हा काम थंडावले जातात. एन-12 येथील नागरीक अतिशय सुज्ञ असुन वारंवार सदरील कामाबाबत विचारणा करत आहे. STP प्लँन्टची टाकी गळत आहे. तसेच फिल्टरची लाईन आणि तलावाची पातळी एकच वाटत आहे. त्यामुळे स्वच्छ व घाण पाणी एकत्र होईल. तसेच सलिम अली सरोवराचे सौदर्यकरणाचे काम पुर्ण केव्हा होणार आहे. याबाबतीत ठोस निर्णय घेण्यात यावा.

मा.सभापती :सदर विषय लांबण्याचे कारण काय आहे.

कार्य.अभियंता (पा.पू.) :लिकेजचा प्रश्न उपस्थित केलेला आहे आरसीसी स्ट्रक्चर आहे ही सामान्य बाब आहे. लिकेजेस बंद करण्याची कार्यवाही सुरू आहे. टेस्टींग केल्यानंतरच पेमेंटची कार्यवाही करण्यात येणार आहे. 5 वर्षांची गॅरेंटी पिरेड आहे.

श्री.मोहन मेघावाले :रोडच्या कामाची चौकशी करण्यात यावी.

कार्य.अभियंता(बिओटी) :सलीम अली सरोवर येथील सौदर्यकरणाचे काम अंतिम टप्यामध्ये आहे. तसेच सलीम अली सरोवर येथे काही खाजगी व्यक्तींचे प्राणी येत आहे त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

श्री.मोहन मेघावाले :ऐतिहासिक सरोवर आहे पुर्वी पासून त्या ठिकाणी जनावरे पाणी पिण्यासाठी जात आहे. दुष्काळाची परिस्थिती आहे जनावरांनाही पाणी मिळायला हवे.

श्री.समीर राजुरकर :टि.व्ही.सेंटर भागात पुन्हा अतिक्रमणांचा विळाखा पडत आहे दर आठवडण्यात टि.व्हि.सेंटर भागात ड्राईव्ह घेण्यात यावा. तसेच टि.व्हि.सेंटर भागात अनाधिकृतरीत्या चालविण्यात येणाऱ्या

मटनशॉपीवर तात्काळ कारवाई करण्यात यावी.

**मा.सभापती** :टि.व्हि.सेंटर भागात ताबडतोब ड्राईव्ह घेण्यात यावे. दर आठवडयात ड्राईव्ह घेण्यात यावे.

**श्री.समीर राजुरकर** :अनाधिकृतरीत्या चालविण्यात येणाऱ्या मटनशॉपवर तात्काळ कारवाई करण्यात यावी.

**मा.सभापती** :टि.व्ही. सेंटर भागात अनाधिकृतरीत्या चालविण्यात येणाऱ्या मटन शॉपवर तात्काळ कारवाई करण्यात यावी.

**श्री.मोहन मेघावाले** :अतिक्रमण विभागाने अतिक्रमण काढलेले आहे परंतु पुन्हा त्या ठिकाणी अतिक्रमण होते त्यामुळे त्या ठिकाणी कायमस्वरूपी अतिक्रमण काढुन सुरक्षा रक्षक नेमण्यात यावे.

**मा.सभापती** :याबाबत प्रशासनाने अतिक्रमण काढुन नियमित ड्राईव्ह घेण्यात यावे. सुरक्षा रक्षक नेमण्यात यावे.

**श्री.समीर राजुरकर** :एकुण कार्यरत अभियंता किती आहे, मेरी परिक्षा पास किती अभियंते आहेत विना मेरी परिक्षा पास केलेले किती अभियंतांना उपअभियंता पदावर पदोन्नती दिलेली आहे माहिती देण्यात यावी.

**आस्थापना अधिकारी-1** :मनपा आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता पदाच्या 68 पदे मंजूर आहेत. त्यापैकी 50 टक्के नामनिर्देशनाने आणि 50 टक्के पदोन्नतीने भरण्याची तरतुद आहे. मेरीची परिक्षा पास करणे आवश्यक आहे. 45 वर्षाची वयोमर्यादा आहे.

**श्री.समीर राजुरकर** :एखादा अभियंता 25 व्या वर्षी नौकरीला लागला व 46 व्या वर्षी त्यास डायरेक्ट उपअभियंता करता येते का? कायद्यात बसते का?

**आस्थापना अधिकारी-1** :परिक्षा द्यायला पाहिजे.

**आस्थापना अधिकारी-1** :सेवेत लागल्यानंतर 5 वर्षाची कालमर्यादा आहे. वयाच्या 45 नंतर त्यास मुभा आहे.

**श्री.समीर राजुरकर** :असे किती जण आहेत.

**आस्थापना अधिकारी-1** :माहिती घेवुन सांगण्यात येईल.

**श्री.समीर राजुरकर** :10-10 वर्ष अभियंता यांनी कुठलीच परिक्षा दिलेली नाही. त्यामुळे कामाच्या स्तरावर परिणाम होतो. मेरीची परिक्षा देण्यास कोणताही जे.ई.तयार नाही. मेरीची परिक्षा देण्यास काय अडचण आहे. प्रशासनाने एकाच माणसास अतिरिक्त पदभार का देण्यात येतो. त्यांचेसोबत 15 कर्मचारी रूजू झाले होते. 15 जनांनमधुन निवड केली का? एका कर्मचाऱ्यासच का अतिरिक्त चार्ज देण्यात आला. गुंठेवारी विभागामध्ये मेरीची परिक्षा पास नसतांना चार्ज देण्यात आला शासन निर्णयात स्पष्ट उल्लेख केलेला आहे की, असे करता येत नाही. चौकशी समितीचा अहवाल आहे. एका विशिष्ट व्यक्तीसाठी सर्व नियम बाजुला ठेवुन चार्ज देण्यात आलेला आहे इतर कर्मचाऱ्यांचाही विचार करायला हवे होते. 5 एप्रिल 2010 रोजी मा.आयुक्तांच्या नावांने महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय काढलेला आहे. त्या शासन निर्णयाचे मा.आयुक्तांनी, आस्थापना विभागाने उल्लंघन केलेले आहे.

**मा.सभापती** :प्रशासनाने संबधीत प्रकरणाची संचिका ताबडतोब मागविण्यात यावी. मागील बैठकीचे कार्यवाहीचे मुद्दयांबाबत प्रशासनाने खुलासा करण्यात यावा. आस्थापना विभागास लागलेल्या आगीच्या प्रकरणाचा अहवालाबाबत खुलासा करण्यात यावा.

**उपआयुक्त (म)** :निवृत्त न्यायाधिश यांची नियुक्ती झालेली आहे.

**मा.सभापती** :सुवर्ण जयंती योजने अंतर्गत वाटप फॉर्मबाबत खुलासा करणे.

**प्रकल्प संचालक (सु.जं.यो.)** :दिनांक 05 तारखेच्या बैठकीच्या अनुषंगाने मा.आयुक्तांशी केलेल्या चर्चेनुसार इतर फॉर्म रद्द केले व 433 प्रपोजलासाठी शिफारस केलेली आहे. सर्व नगरसेवकांचे 4 फॉर्म आलेले नाही. 416 पैकी 357 प्रपोजल विभागात आलेले आहे. मा.उपआयुक्त प्रशासन यांचेकडे फॉर्मची काही स.नगरसेवकांनी मागणी केली होती त्यानुसार त्यांना ते फॉर्म देण्यात आलेले आहे. सर्व संचिकांना

स.नगरसेवकांचे पत्र लावण्यात आलेले आहे.

श्री.समीर राजुरकर :बँकेकडे पाठविण्यात आलेल्या संचिकेंची माहिती,मंजूरीअंती असलेल्या संचिकेची माहिती कोणत्या स.नगरसेवकांच्या शिफारशी आहेत याबाबत सविस्तर माहिती देणे आवश्यक आहे.

प्रकल्प संचालक (सु.जं.यो.) :416 व्यतिरिक्त अतिरिक्त मा.उपआयुक्त प्रशासन यांचे मंजूरीनुसार दिलेले फॉर्मची माहीती देण्यात यावी.

प्रकल्प संचालक (सु.जं.यो.) :स.सदस्य श्री.विजेंद्र जाधव, श्रीमती ज्योती वाघमारे, श्री.संजय जोशी -5 फॉर्म, स.श्री.अफसर खान, श्री.बेहडे, श्री.आगा खान, यांना 06 फॉर्म श्री.अमित भुईगळ 8 फॉर्म श्री.मिलिंद दाभाडे-6 फॉर्म, श्रीमती घोडेले यांना 04 फॉर्म दिलेले आहे. 437 फॉर्मचे उद्दिष्ट आहे.

मा.सभापती :प्रथमत:चार फॉर्मला प्राधान्य देण्यात यावे. 416 ला प्राधान्य देण्यात यावे. ज्यांनी अतिरिक्त मागणी केलेली आहे त्यांना जास्तीचे फॉर्म दिलेले आहेत. मागणी केली नाही म्हणुन आम्हाला अतिरिक्त फॉर्म दिलेले नाही.

प्रकल्प संचालक (सु.जं.यो.) :बँकेमध्ये पाठविण्याची आणि शिफारस करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. मंजूरीचे अधिकार संबधीत बँकेला आहे.

मा.सभापती :सभागृहामध्ये निर्णय झाल्यानंतर अतिरिक्त फॉर्म कुणाच्या अधिकारात दिले.

प्रकल्प संचालक (सु.जं.यो.) :23 फॉर्म रद्द केलेले आहे. 42 अर्ज आलेले आहेत.

मा.सभापती :आपल्यावर कारवाई का करण्यात येवु नये.

प्रकल्प संचालक (सु.जं.यो.) :मा.उपआयुक्त प्रशासन यांचेशी चर्चा करून निर्णय घेतलेला आहे.

उपआयुक्त (प्र) :यासंदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा झालेली आहे.

मा.सभापती :सभागृहाचे आदेश न पाळता फॉर्मचे वाटप करण्यात आलेले आहे. या संदर्भात सभागृहात काय ठरले ?

उपआयुक्त (प्र) :या संदर्भात सभागृहात काहीही ठरलेले नाही. दिनांक 05 तारखेच्या सभेमध्ये नगरसेवकांच्या शिफारशी शिवाय इतर फॉर्म बँकेला पाठवू नये व ते फॉर्म रद्द करणे संदर्भात ठरले होते परंतु प्रत्येक नगरसेवकाला चार चार फॉर्म देण्यासंदर्भाने सभागृहात कुठलाही निर्णय झालेला नाही. प्रत्येक नगरसेवकाला चार फॉर्म देण्यासंदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा करून निर्णय घेण्यात आला. बँकेमध्ये उद्दिष्टाच्या दिडपट फाईल पाठवाव्या लागतात. संघटनेच्या माध्यमातुन, पक्षाच्या माध्यमातुन ज्या मागण्या येत होत्या त्या संदर्भाने खुल्या माध्यमातुन अर्ज घेवुन लीड बँकेच्या नियमाप्रमाणे 650 प्रकरणे/अर्ज पाठविणे आवश्यक आहे. नगरसेवकांनी शिफारस केलेले 432 फॉर्म पाठवावे त्यानंतर दिडपट प्रकरणाचे नागरीकांकडुन,संघटनेकडुन फॉर्म मागविण्यात आले होते ते सुध्दा फॉर्म रद्द करण्यात आलेले होते.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रत्येकी नगरसेवकांना 4 फॉर्म वाटप केले असतांना काही नगरसेवकांनी पाठपुरावा केल्यामुळे त्यांना 8-8 फॉर्म देण्यात आलेले आहे.

उपआयुक्त (प्र) :पाठपुरावा केल्यास अतिरिक्त फॉर्म देण्यात येईल.

**मा.सभापती** :फार्म् देण्याबाबत भेदभाव करण्यात येवु नये. 650 फॉर्मचे स.सदस्यांना समप्रमाणात वाटप करण्यात यावे. याबाबतची माहिती स.सदस्यांना देण्यात यावी.

**आस्थापना अधिकारी-1** :मा.आमदार श्री.सतिष चव्हाण यांनी मा.नामदार श्री.भास्कर जाधव यांना त्यात नमुद केले होते की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये सहायक संचालक नगररचनाकार श्री.जयंत खरवडकर, शाखा अभियंता यांचे नियमाची उल्लंघन केलेली बेकायदेशिर नियुक्ती रद्द करणे बाबत मा.नामदार श्री.भास्कर जाधव यांनी मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी परिपत्रकाप्रमाणे कारवाई करून त्यासोबत 5 एप्रिल 2010 चे परिपत्रक जोडलेले आहे. नगर रचना संचनालयातील तांत्रिक संवर्गातीत अधिकाऱ्यांना संचालनयात काम करीत असतांना भूमि आयोजनसंबधी ज्ञान प्राप्त झालेले असते. त्यांना विविध प्रकाराचे जमिनीचे व भुमिचे मुल्यांकन करण्यासंबधी ज्ञान व अनुभव प्राप्त झालेला असतो. सहाय्यक संचालक नगररचना विभागातील अधिकाऱ्यांना नगर रचना योजना महापालिका, नगरपालिका क्षेत्रातील विकास योजना तयार करण्यासंबधी तसेच प्रादेशिक योजना तयार करण्यासंदर्भातील अनुभव प्राप्त झालेला असतो. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम 66 चे कलम 153 (1) तसेच मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949चे कलम 51 (1)(2) अन्वये आयुक्त महापालिका यांना अधिकाऱ्यांच्या सक्षम वापर करण्यासंदर्भात व महानगरपालिकेचे व्यापक हित पाहता सहाय्यक संचालक नगर रचना, नगररचना हे पद शासकीय आस्थापनेवरील अधिकाऱ्यांमधुन भरने आवश्यक आहे. तथापी राज्यातील बहुतांशी महापालिकेमधील पुरेशी शैक्षणिक अर्हता व अनुभव नसलेल्या महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील संवर्गबाहय अधिकारी सहाय्यक संचालक नगररचना पदावर नियुक्ती मिळवित आहेत. अथवा नियुक्ती मिळवुन देऊ इच्छित आहे.ही बाब प्रशासकीयदृष्ट्या संयुक्तीक नाही.तरी महानगरपालिकेतील नगररचना संवर्गातील सहाय्यक संचालक नगर रचना पदावर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कोणत्याही अधिकाऱ्यास नियुक्ती देण्यात येऊ नये अथवा सदर पदाचा अतिरिक्त पदभारही देण्यात येवु नये. तसेच सहायक संचालक न.र.पदावरील अधिकाऱ्यास त्याची सर्व कामे देण्यात यावी.

**श्री.समीर राजुरकर** :आदेश केव्हा काढण्यात आले.

**आस्थापना अधिकारी-1** :5 एप्रिल 2010 रोजीचे शासन निर्णय आहे. 31.08.2010 रोजी आदेश काढण्यात आलेले आहे.

**श्री.समीर राजुरकर** :आदेशाचे उल्लंघन केलेले आहे.

**आस्थापना अधिकारी-1** :टिप्पणीमध्ये स्पष्ट नमुद केलेले आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत श्री.जयंत खरवडकर, शाखा अभियंता यांनी वेळोवेळी अर्ज देऊन मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सहा.नगररचनाकार पदावर पदस्थापना देणेबाबत

विनंती केलेली आहे त्यानुषंगाने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक 94/95 दि.04.03.2003 अन्वये श्री.जयंत खरवडकर यांना सहा.संचालक नगररचनाकार हे पद रिक्त असल्यास त्या पदावर पदस्थापना देणेबाबतचे स्वातंत्र महापालिकेस देण्यात आलेले आहे. विधी सल्लागार यांनी नगर रचना विभागास सहा. नगर रचनाकार हे पद रिक्त असल्यास संबधीत कर्मचाऱ्याच्या योग्यतेबाबत सहा.संचालक न.र.यांचा अभिप्राय घेऊन सहाय्यक नगरसंचालक या पदावर पदस्थापना देता येईल म्हणुन अभिप्राय दिलेला आहे. श्री.जयंत खरवडकर मनपा आस्थापनेवर शाखा अभियंता या पदावर 9300-3488 ग्रेड-पे 4400 या वेतनश्रेणीमध्ये कार्यरत आहेत. महानगरपालिका सेवा भरती नियमात सहा.संचालक नगररचनाकार हे पद मंजूर आहे तसेच संबधीताने यापुर्वी या पदावर काम केलेले आहे. तसेच सहा.संचालक न.र. व शाखा अभियंता हे पद समकक्ष व एकाच वेतनश्रेणीतील असल्याने मा.उच्च न्यायालयाने दिनांक 04.06.2003 रोजी निर्देश दिले आहे.

श्री.समीर राजुरकर :दि.27.02.2012 रोजी तत्कालिन आयुक्तांनी मा.आमदार श्री.सतिश चव्हाण यांचे पत्रावर कोणता शेरा दिला.

आस्थापना अधिकारी-1 :तात्काळ प्रकरण सादर करा म्हणुन शेरा दिला त्यानुसार सादर करण्यात आले होते. तत्कालिन आयुक्त श्री.कुणाल कुमार याचेकडे सादर करण्यात आले होते त्यांनी चर्चा करा म्हणुन शेरा दिला आहे.

या प्रकरणात शासनाने कारवाई करून कळविण्याबाबत निर्देश दिले होते. सन 2010 पुर्वीचे आहेत. परिपत्रकाचा उल्लेख टिप्पणीमध्ये स्पष्टपणे केलेला आहे.

श्री.समीर राजुरकर :नियमबाहय काम केलेले आहे. परिपत्रकाचे उल्लंघन केलेले आहे. माहितीच्या अधिकारात माहिती मागविलेली आहे. प्रकरण क्रमांक 1 मध्ये 36 लाख 67 हजाराचा दंड प्रस्तावित केला होता, प्रकरण क्रमांक 2 मध्ये 57 लाख 20 हजार तिसऱ्या प्रकरणात 30 लाख 06 हजाराचा दंड प्रस्तावित केलेला होता. चौथ्या प्रकरणात 17 लाख 25 हजार, पाचव्या प्रकरणात 8 लाख 29 हजार, दंड प्रस्तावित केला होता या प्रस्तावित दंडामध्ये सुधारणा करण्यात आली व 77 लाख रूपये कमी करण्यात आले. 77 लाख रूपयांचे नुकसान झ ालेले आहे. 1 कोटी 49 लाख 47 हजार प्रस्तावित दंड आहे आणि मंजूर 2 कोटी 22 लाख 46 हजार रूपयाची आहे. 77 लाखाचे नुकसान करत आहे. सदर संचिका का दाबण्यात येते. कारवाई का प्रस्तावित केली. खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :प्रशासनाने उल्लंघन केलेले आहे का?

आस्थापना अधिकारी-1 :परिपत्रकाची बाब स्पष्टपणे कमिटीसमोर ठेवलेली आहे.

श्री.समिर राजुरकर :प्रशासनाने सादर केलेल्या टिप्पणीमध्ये शेवटचा परिच्छेदबाबत माहिती द्यावी.

आस्थापना अधिकारी-1 :उपसचिव, मंत्रालय, महाराष्ट्र शासनाचे 2410158/प्रक्र/5110/नवि दिनांक 5.04.2010 अन्वये महापालिकेतील उपसंचालक, नगररचना

सहाय्यक संचालक, नगर रचना व नगररचनाकार या पदावरील महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्याची नियुक्ती न करणे बाबत. आस्थापना अधिकारी-1 यांनी ही बाब कमिटीसमोर प्रस्तावित केलेली आहे. कमिटीमध्ये आस्थापना अधिकारी-1, उपआयुक्त महसूल, शहर अभियंता, मुख्यलेखा परिक्षक, आहेत मा.न्यायालयाचे निर्णयाचा उल्लेख स्पष्टपणे केलेला आहे.

**श्री.समीर राजुरकर** :कुठलेही पद स्वतंत्रपणे भरतांना कुठले निकष लावण्यात आलेले आहे. समकक्ष असलेले किती कर्मचारी आहेत.

**आस्थापना अधिकारी-1** :समकक्ष हा निकष लावण्यात आला. 68 कर्मचारी समकक्ष आहेत. परंतु कुणाची मागणी नव्हती. श्री.जयंत खरवडकर यांची मागणी होती. प्रकरण न्यायालयात गेले होते.

**मा.सभापती** :मा.न्यायालयाने काय आदेश दिले.

**आस्थापना अधिकारी-1** :महानगरपालिकेला स्वातंत्र आहे त्यांनी आपल्या नियमानुसार निर्णय घेण्यात यावा. योग्य असेल तर अर्जदाराला पदस्थापना द्या म्हणुन निर्णय दिलेला आहे.

**श्री.समीर राजुरकर** :संबधीतास त्या पदावर पदस्थापना द्या म्हणुन मा.न्यायालयाने आदेश दिलेले नाही. त्या पदाला भरण्याचे स्वातंत्र महापालिकेला आहे. असा आदेश दिलेला आहे. 68 कर्मचाऱ्यांचे निकष का लावण्यात आलेले नाही. प्रशासन मागणीनुसार पदे भरणार आहेत का?

**आस्थापना अधिकारी-1** :विधी सल्लागार यांनी अभिप्राय दिलेला आहे. रिट याचिका क्रमांक 2594/95, दिनांक 04.06.93च्या निकालाप्रमाणे श्री.जयंत खरवडकर यांचा नगर रचना विभागात सहा.नगररचनाकार हे पद रिक्त असल्याने देण्याचे स्वातंत्र महापालिकेला दिले आहे. मा.न्यायालयाचे निर्देशाचे पालन न केल्यास कंन्टेम्प्ट होईल. नगर रचनाकार हे पद रिक्त असल्यास संबधीत कर्मचाऱ्याच्या योग्यतेबाबत सहा.संचालक न.र.यांचा अभिप्राय घेऊन सहाय्यक नगरसंचालक या पदावर पदस्थापना देता येईल म्हणुन अभिप्राय दिलेला आहे. त्या नंतर संचिका ADTP यांचेकडे गेली त्यांनी अभिप्राय दिलेला आहे की, नगर रचना विभागातील अनुभव आहे. सबब त्यांची नगररचनाकार पदावर नियुक्ती दिल्यास नगर रचना विभागास त्याचा उपयोग होईल.

**श्री.समीर राजुरकर** :पद भरले नाही तर कंन्टेम्प्ट होईल.

**विधी सहाय्यक** :या प्रकरणी (रिट याचिका क्रमांक 2594/95, दिनांक 04.06.93) मा.न्यायालयाचे आदेश विधी सहाय्यक तथा प्र.नगर सचिव सभागृहात वाचून दाखवितात.

**श्री.समीर राजुरकर** :आदेशामध्ये संबधीतास पदस्थापना देण्याबाबत स्पष्ट उल्लेख नाही. 68 कर्मचारी कार्यरत होते 22 कर्मचाऱ्यांना नगर रचना विभागाचा अनुभव होता. 68 कर्मचाऱ्यांची मुलाखत न घेता निर्णय घेण्यात आला हा त्या कर्मचाऱ्यांवर अन्याय आहे. प्रिमियम आणि दंड याच्या बाबतीत प्रस्तावित कारवाई किती रूपयांची होती आणि प्रत्यक्षात वसुली किती रूपयांची झाली. मा.आयुक्तांची मान्यता याबाबतीत खुलासा घेण्यात यावा. 77 लाखाच्या नुकसानास कोण

जबाबदार आहे.

**सहा.संचालक न.र.** :पाच प्रकरणांमध्ये जो दंड आकारण्यात आलेला आहे तो दुरूस्त करून पुन्हा लावण्यात आलेला आहे. दुरूस्त करण्याची गरज नव्हती परंतु ती गरज पडली म्हणुन मा.आयुक्तांकडे सबमिशन सादर केलेले आहे की, एवढे नुकसान होऊ शकते. साधारणतः 72 लाखाचे नुकसान होत होते.

**मा.सभापती** :72 लाखाचे नुकसान होत असतांना त्यास मान्यता देण्यात येते.

**सहा.संचालक न.र.** :मान्यता दिलेली नाही. दुरूस्त करून घेतले त्या नंतर मा.आयुक्तांची मान्यता घेण्यात आली. काही त्रृटी राहील्या होत्या.

**श्री.समीर राजुरकर** :भोगवटयाची चौकशी करण्यासंदर्भात आदेश दिलेले आहे. लाखोचे नुकसान झालेले आहे. आवडीनिवडीनुसार कामकाज हवे असल्यास प्रशासन सर्वांना विचारणा करून त्यानुसार काम देण्यात यावे. श्री.मझर यांची दोन महिने बदली झाली तरी रूजु होत नाही. अशा पध्दतीने महापालिका कशी चालणार.

**श्री.रेणुकादास वैद्य** :सदरील बाब गंभिर आहे. याबाबत मा.सभापती यांनी तातडीने आदेश द्यावे.

**श्री.समीर राजुरकर** :प्रकरण गंभिर स्वरूपाचे आहे.

**कार्य.अभियंता(श्री.कोल्हे)** :सदरील कर्मचाऱ्याचे आदेश विभागात प्राप्त झालेले नाही.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :नगर रचना विभागाचे पुर्नबांधणी करण्यात यावी. अनेक अधिकारी, कर्मचारी अनेक वर्षापासून एकाच विभागात कार्यरत आहेत. त्यांच्या बदल्या करण्यात यावे.

**मा.सभापती** :स.सदस्य श्री.समीर राजुरकर यांनी जो मुद्दा मांडलला आहे, नगररचनाकार पदावर श्री.खरवडकर यांचे झालेल्या नियुक्ती संबधी व 77 लाख रूपयांच्या नुकसानबाबती मा.आयुक्त महोदय यांनी चौकशी करून 15 दिवसात अहवाल सभागृहापुढे सादर करण्यात यावा. सर्व प्रभागाचे पुर्नबांधणी करण्यासंदर्भात प्रशासनाने निर्णय घ्यावा.

**विषय क्र. 154 :** (विषय क्र. 147 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 05/02/2013 (का.प.क्र.26) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** :विषय क्रमांक 154 स्थगीत.

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत करण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. 155 :** (विषय क्र. 148 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 05/02/2013 (का.प.क्र.26) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 27/07/2012 (का.प.क्र.7), 03/08/2012 (का.प.क्र.8), 10/08/2012 (का.प.क्र.9), 21/08/2012 (का.प.क्र.10), 28/08/2012 (दि.21/08/2012 ची तहकुब सभा) (का.प.क्र.10), 28/08/2012 (का.प.क्र.11) व 07/09/2012 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** :विषय क्रमांक 155 स्थगीत.

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत करण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. 156 :**

**कार्यकारी अभियंता वार्ड ई व फ महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वार्ड क्रं. हॉटेल विटस ते आनंद गाडे चौक पर्यंत रस्त्यालगत फुटपाथ बांधणे, ड्रेनेज लाईन बदलणे व सौंदर्यीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.1,19,83,122/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्रं.72 दि.17/12/2012 अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झ ााली असून, सदरील कामासाठी निविदा मागविली असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नाव | निविदा दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|
| 01. | मे. एल. के. कन्स्ट्रक्शन | 9.99 % जास्त दराने |
| 02. | मे. उदय इंजिनियरिंग वर्क्स | 17.01 % जास्त दराने |

**वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी तथापी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.99 % जास्त आहे.**

**तथापी वाटाघाटी अंतर्गत मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.99 % जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. करीता मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराचे निविदा पत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.**

**मा.सभापती :विषय क्रमांक 156 स्थगीत, पुढील बैठकीत विषय ठेवण्यात यावा.**

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव तुर्त स्थगीत करण्यांत येतो. पुढील बैठकीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. 157 :**

**मा.सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, मोहल्ला चिकलठाणा येथील आठवडी बाजारच्या जागेमध्ये आठवड्यातील दोन दिवस मंगळवार व शनिवार या दिवशी शेळी, मेंढी व बकरी कातडी व कोंबडी बाजार भरविणे करीता जागा भाडे तत्वावर मिळावी म्हणुन अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश (बक्कर कसाब) खाटीक संघटना यांनी मागणी केली आहे. सदर संस्था नोंदणीकृत आहे.**

**या ठिकाणी सध्या आठवडी बाजार भरत आहे. त्यासाठी आठवड्यातून एक दिवस जागा वापर होतो. यासाठी सध्या ठेकेदारामार्फत प्रतिबाजार रक्कम रू.8501/- एवढी रक्कम आठवडीबाजार शुल्क पोटी प्राप्त होते. सदर रक्कम निविदा पध्दतीने निश्चित झाली आहे. दरम्यान आता संस्थेच्या मागणी संबंधाने संस्थेने स्वंतत्रपणे शेळी, मेंढी, विक्री खरेदी बाजार हा नविन उपक्रम असून त्यासाठी संबंधीत संस्थेने सदर बाजारास मिळणारा प्रतिसाद व सदर बाजार प्रायोगिक तत्वावर भरविण्यात येत आहे, म्हणुन आठवड्यातील दोन दिवस मंगळवार व शनिवार याप्रमाणे बाजार भरविणेसाठी रू.12,500/- प्रतिमाह भाडे देणेचे प्रस्तावित केले आहे.**

**सध्या सदर आठवडी बाजारापासून प्रतिमाह 4 बाजारा इतकेच उत्पन्न मिळते व जागाही इतर कालावधीत विना वापर असते. प्रायोगिक तत्वावर आठवड्यात दोन दिवस उक्त बाजाराकरीता जागा वापरल्यास महानगरपालिकेस अतिरिक्त उत्पन्न मिळते व बाजारास मिळणारा प्रतिसाद बाजाराबाबत नागरीकांमध्ये होणारी चर्चा व प्रसिध्दी यासंबंधाने नंतर निविदा माध्यमातून भाडे ऑफर घेऊन भाडे निश्चिती करण्यात येईल. यास अधिन राहून तीन महिन्याचे कालावधी करीता प्रायोगिक तत्वावर सदर बाजार फक्त शेळी, मेंढी व बकरी कातडी, कोंबडी बाजार आठवड्यातून**

दोन दिवस मंगळवार व शनिवार या दोन दिवसासाठी उक्त भाडे दराने देण्यास प्रशासकीय मान्यता झ ाली आहे. यामुळे सदर जागा इतर वापरासाठी वापरणेसाठी विकसीत करता येईल / वापरता येईल.

करीता वरीलप्रमाणे महाराष्ट्र प्रदेश (बक्कर कसाब) खाटीक संघटना यांना आठवड्यातील दोन दिवस मंगळवार व शनिवार करीता प्रतिमाह रू.12,500/- ने प्रायोगिक तत्वावर चिकलठाणा येथील आठवडी बाजार भरविणेस जागा इतर अटी/शर्ती करारास अधिन राहुन भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

मा.सभापती : विषय क्रमांक 157 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला चिकलठाणा येथील आठवडी बाजारच्या जागेमध्ये आठवड्यातील दोन दिवस मंगळवार व शनिवार या दिवशी शेळी, मेंढी व बकरी कातडी व कोंबडी बाजार भरविणे करीता अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश (बक्कर कसाब) खाटीक संघटना (नोंदणीकृत संस्था) यांनी मागणी केल्यानुसार प्रतिमाह रू.12,500/- प्रमाणे प्रायोगिक तत्वावर चिकलठाणा येथील आठवडी बाजार भरविणेसाठी जागा इतर अटी/शर्ती करारास अधिन राहुन भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 158 :**

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला औरंगपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील पिया व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र. (26) संबंधाने अर्जदार श्री.आशिष अविनाश सुरडकर यांनी विनंती केली आहे. सदर दुकानाचे क्षेत्रफळ 7.2 चौ. मी. एवढे आहे. सदर दुकान यापुर्वी प्लास्टीक हटाव मोहिमेत दिलासा स्वयंसेवी संस्थेस देण्यात आले होते. याबाबत प्रकल्प संचालक यांचे अभिप्राय घेऊन त्यांचे अभिप्रायानुसार सदर गाळयामध्ये संस्थेमार्फत कोणताही उपक्रम आजपर्यंत राबविण्यात आलेला नाही. तसेच सदर संस्थेने 2010 पासून आतापर्यंत इच्छा दर्शविली नाही. करीता अर्जदार श्री.आशिष अविनाश सुरडकर यांचे मागणीनुसार सदर दुकाना करीता या वर्षीचे सिध्द शिघ्र गणकानुसार वार्षिक भाडे निश्चित करून नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधिन राहुन सदर दुकान तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्यास प्रशासकीय मान्यता झाली आहे.

करीता वरीलप्रमाणे अर्जदार श्री.आशिष अविनाश सुरडकर यांना दुकान क्र. (26) प्रतिमाह रक्कम रू.27641/- भाडे (इतर कर अनामत रक्कम इ. वेगळे) आकारून तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.समीर राजुरकर : प्रस्तावात अनावधानाने प्रतिमाह नमुद केलेले आहे, त्याऐवजी वार्षिक अशी दुरूस्ती करावी. सदरील मार्केटमध्ये इतर दुकानांना 9500 ते 10,000/- वार्षिक भाडे आकारून दुकाने भाडे तत्वावर दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे याही दुकानास वार्षिक रू.10,000/- भाडे आकारून (महानगरपालिकेच्या अटी,शर्ती व टॅक्स आकारून) देण्यांत यावे.

श्री.रेणुकादास वैद्य : प्रतीमाह ऐवजी प्रतीवर्ष अशी दुरूस्ती करण्यांत यावी. कमीत कमी 10 वर्षासाठी दुकान भाडे तत्वावर देण्यात यावे.

विधी सहाय्यक : सुरूवातीचे तीन वर्षासाठी द्यावे लागेल.

मा.सभापती : 30 वर्षासाठी दुकान भाडे तत्वावर देण्यात यावे. दर तीन वर्षांनी पुनर्नोंदणी (रिनिव्हल) करून भाडे तत्वावर देण्यांत यावे. वार्षीक रू.10,000/- भाडे आकारण्यांत यावे. यासह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, मोहल्ला औरंगपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील पिया व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र. (26) अर्जदार श्री.आशिष अविनाश सुरडकर यांनी विनंती केल्यानुसार त्यांना सदर दुकान वार्षीक रू.10,000/- भाडे आकारणी करून व दर तीन वर्षांनी पुनर्नोंदणी (रिनिव्हल) करण्याच्या अटीवर आणि नेहमीच्या अटी/शर्तीस अधिन राहुन सदर दुकान 30 वर्षासाठी भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 159 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेसंबंधी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे व इतर विविध न्यायालयात मनपातर्फे न्यायालयीन कामकाज पाहण्यासाठी विधीज्ञांचे पॅनल कार्यरत आहे. सद्यस्थितीत या पॅनलवर (मा.सर्वोच्च न्यायालय-2, मा.उच्च न्यायालय-16, जिल्हा व इतर न्यायालयाकरीता -17) विधीज्ञ कार्यरत आहेत.

सदरील नियुक्त पॅनलवरील विधीज्ञांना दि.27/01/2005 रोजीच्या आदेशानुसार खालील प्रमाणे फी व खर्च विहीत अटी व शर्तीसह मंजुर करण्यात आलेले असुन त्याच दराने फी व खर्च संबंधीतांना आजपर्यंत अदा करण्यात येत आहे. सुलभ संदर्भाकरीता सदर अनुज्ञेय फी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | न्यायालय | वकील फी | खर्च | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | मा.दिवाणी व जिल्हा न्यायालय | 1500/- | 500/- | 2000/- |
| 2 | मा.औद्योगिक व कामगार न्यायालय | 1500/- | 500/- | 2000/- |
| 3 | एस.एल.आर./डी.डी.एल.आर./सीटी सर्व्हे | 1500/- | 500/- | 2000/- |
| 4 | मा.उच्च न्यायालय | 3000/- | 1000/- | 4000/- |
| 5 | मा.सर्वोच्च न्यायालय | मा.आयुक्त यांना अधिकार | | |
| 6 | कॅव्हेट (फी व खर्च) | -- | -- | 500/- |

अटी व शर्ती :-

1. प्रत्येक प्रकरणाच्या सुरूवातीला बील सादर केल्यानंतर न्यायप्रविष्ट प्रकरणात प्रथमतः एकूण फीसच्या अर्धी रक्कम व संपुर्ण खर्च देण्यात येईल.
2. राहीलेली अर्धी फीस दाव्याचा निकाल लागल्यानंतर व दाव्याच्या निकालाची प्रमाणित प्रत सादर केल्यानंतर अदा करण्यात येईल.
3. विशिष्ट प्रकरणांमध्ये प्रकरणाचे स्वरूप व महत्व लक्षात घेऊन विशिष्ट फी मंजुर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांचे राहतील.
4. मा.सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणांत नियुक्त विधीज्ञास वकील फी मंजुर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना असतील.
5. Arbitration Processing मधील फी मंजुर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना असतील.

प्रोफेशनल फी वाढी संदर्भाने मनपा पॅनलवरील विधीज्ञ श्री.संजय एन.पगारे व इतर यांनी दि.26/09/2012 रोजी मा.आयुक्त यांना निवेदन दिलेले आहे. सदर निवेदनात संबंधीतांनी इतर महानगरपालिकेत रू.15,000/- पेक्षा जास्त खर्चा व्यतिरिक्त वकील फी म्हणुन अदा करण्यात येतात. जळगाव, अहमदनगर व नाशिक महानगरपालिकेतसुध्दा याच दराने फी व खर्च दिल्या जातो. प्रकरणाची माहिती जमा करणे, प्रतिज्ञापत्र तयार करणे, माहितीची देवाण-घेवाण करणे, निर्णयाच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करून इत्यादी अनुषंगीक खर्च करावा लागतो. त्यामुळे सदर निवेदनावर सहानुभुतीपुर्वक विचार करणे बाबत विनंती केलेली आहे.

जिल्हा परिषद औरंगाबाद येथील असलेल्या विधीज्ञांच्या पॅनलवरील विधीज्ञांना मा.उच्च न्यायालयातील प्रकरणात प्रती प्रकरण रू.5,000/- फीस व खर्च रू.3,000/- असे एकुण रू.8,000/- अदा करणेबाबत दि.26/12/2011 च्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.21 अन्वये ठराव क्र.579 प्रमाणे मंजूर झालेला आहे. सुलभ संदर्भाकरीता सदर ठरावाची प्रत अवलोकनार्थ जोडण्यांत आलेली आहे.

सद्यस्थितीत न्यायालयीन स्टँप ड्युटी, ॲडजॉनमेंट, स्टँम्प ड्युटी, ॲफीडेव्हीट तयार करणे, स्टेनो चार्जेस, टायपींग चार्जेस, झेरॉक्स व इतर न्यायालयीन प्रोसेस फी अशा स्वरूपाचा खर्च वाढलेला असल्याने मनपा पॅनलवरील विधीज्ञांना पुरेशी वकील फी व खर्च देणे आवश्यक आहे. ज्यामुळे मनपा पॅनलवरील विधीज्ञ चांगल्या कार्यक्षमतेने व कौशल्याने मनपाची बाजू मांडून न्यायालयीन कामकाज करतील. वरील फी व खर्च कमी असल्यामुळे मनपा पॅनलवरील विधीज्ञ नेहमी फी वाढ करणे बाबत विनंती करीत आहे. कमी फी असल्यामुळे पॅनलवरील वकील जेष्ठ विधीज्ञ/हायकोर्ट मधील अनुभवी वकील त्याबद्दल नाराजी व्यक्त करतात व त्याचा परिणाम न्यायालयीन कामकाजावर होतो.

यानुसार उपरोक्त बाबी व न्यायालयीन कामाचे महत्व लक्षात घेता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मनपा विधीज्ञांच्या पॅनलवरील वकीलांना न्यायप्रविष्ट असलेल्या प्रकरणांत पुढील प्रमाणे फी व खर्चात वाढ करणेस प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | न्यायालय | वकील फी | खर्च | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | मा.दिवाणी व जिल्हा न्यायालय | 3,000/- | 2,000/- | 5,000/- |
| 2 | मा.औद्योगिक व कामगार न्यायालय | 3,000/- | 2,000/- | 5,000/- |
| 3 | एस.एल.आर./डी.डी.एल.आर./सीटी सर्व्हे | 5,000/- | 2,000/- | 7,000/- |
| 4 | मा.उच्च न्यायालय | 6,000/- | 4,000/- | 10,000/- |
| 5 | कॅव्हेट (फी व खर्च) | 2,000/- | -- | पुर्ण |
| 6 | मा.सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणांत वकील फी व खर्च मंजुर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना असतील. | मा.आयुक्त यांना असतील | | |
| 7 | स्पेशल कौन्सिल / सिनिअर कौन्सिल यांना विशिष्ट प्रकरणात नेमण्याचे व वकील फी मंजूर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना असतील. | मा.आयुक्त यांना अधिकार असतील | | |
| 8 | ग्राहकमंच /राज्य ग्राहकमंच | 6,000/- | 2,000/- | 8,000/- |

करिता मनपाच्या पॅनलवरील वकीलांना वकील फी व खर्चात उपरोक्त प्रमाणे वाढ करणेसाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.समीर राजुरकर :वकीलांची पॅनल निश्चित करतांना अतिशय काटेकोरपणे केली पाहीजे. दोन वर्षापुर्वीचे निर्णय एक्सपार्टी निर्णय झालेले आहे. जिल्हा न्यायालयाचे पॅनलचे पुर्नबांधणी करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :दरवाढ करण्यास हरकत नाही. महानगरपालिकेच्या वकीलांनी पारदर्शक व चांगले काम करावे अशी सभागृहाची भावना आहे. वर्षानुवर्ष तेच पॅनल आहे. अनेक वकील मा.न्यायालयात जात नाही. मनपाचे प्रकरण व्यवस्थित हाताळत नाही. चांगले काम करणारे पॅनलवर राहु द्यावे नविन वकीलांना संधी देण्यात यावे.

मा.सभापती :पॅनलचे पुर्नबांधणी करण्यात यावे. ज्या वकीलांची मनपाच्या पॅनलवर काम करण्याची इच्छा आहे त्यांना पॅनलवर घेण्यात यावे. तसेच पॅनलवर कार्यरत चांगले काम करणारे वकीलांना संधी देण्यात यावी कामाचा आढावा बघण्यात यावा. याबाबतचे (पुर्नबांधणीचे) अधिकार मा.आयुक्तांना देण्यात येतात. मा.आयुक्तांनी योग्य तो निर्णय घ्यावा. विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विधीज्ञांच्या पॅनलवरील वकीलांना न्यायप्रविष्ट असलेल्या प्रकरणांत प्रस्तावात दर्शविलेल्या अटी/शर्तीप्रमाणे खालीलप्रमाणे फी व खर्चात वाढ करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | न्यायालय | वकील फी | खर्च | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | मा.दिवाणी व जिल्हा न्यायालय | 3,000/- | 2,000/- | 5,000/- |
| 2 | मा.औद्योगिक व कामगार न्यायालय | 3,000/- | 2,000/- | 5,000/- |
| 3 | एस.एल.आर./डी.डी.एल.आर./सीटी सर्व्हे | 5,000/- | 2,000/- | 7,000/- |
| 4 | मा.उच्च न्यायालय | 6,000/- | 4,000/- | 10,000/- |
| 5 | कॅव्हेट (फी व खर्च) | 2,000/- | -- | पुर्ण |
| 6 | मा.सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणांत वकील फी व खर्च मंजुर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना असतील. | मा.आयुक्त यांना असतील | | |
| 7 | स्पेशल कौन्सिल / सिनिअर कौन्सिल यांना विशिष्ट प्रकरणात नेमण्याचे व वकील फी मंजूर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना असतील. | मा.आयुक्त यांना अधिकार असतील | | |
| 8 | ग्राहकमंच /राज्य ग्राहकमंच | 6,000/- | 2,000/- | 8,000/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. 160 :</u>

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेतर्फे रोशन गेट ते आझाद चौक रस्ता रूंदीकरणामध्ये मिळकत बाधित झाल्याने खालील मिळकत धारक पुर्णपणे विस्थापित झाले आहेत. या संबंधाने मिळकतधारकाने केलेले उपोषण वेळी संबंधीतांचे मागणीनुसार त्यांचे उद्योगकरीता पुनर्वसनाच्यादृष्टीने त्यांना महानगरपालिका व्यापारी संकुलात दुकाने भाडे तत्वावर देण्याचे आश्वासित करण्यात आले होते. किमान भाडे आकारण्यासंबंधाने 60% सवलत देण्यात येऊन 40% भाडे आकारणी करण्यात आली. त्यानुसार त्यांची मागणी व रस्ता रूंदीकरणातील अडचणी/अडथळे दुर करण्याचे दृष्टीने तसेच विस्थापितांचे प्रति सकारात्मक दृष्टीकोन ठेवून त्यांना भाडे सवलत देऊन दुकाने भाडे तत्वावर देण्याचे प्रशासकीय मान्यता झाली आहे.

| अ.क्र. | नाव | दुकान क्र. | क्षेत्र | भाडे (60% सवलत) | इतर कर |
|---|---|---|---|---|---|
| 01 | श्री.भरत खंडुजी दळवे (पिया व्यापारी संकुल, औरंगपुरा) | 17 | 7.2 | 11056/- | सेवा शुल्क, सेवा कर |
| 02 | श्री.शेख सांडु ताज मोहम्मद (कबाडीपुरा व्यापारी संकुल, कबाडीपुरा) | 7 | 19.38 | 27892/- | सेवा शुल्क, सेवा कर |
| 03 | श्री.साहेब खान अजीज खान (कबाडीपुरा व्यापारी संकुल, कबाडीपुरा) | 8 | 19.38 | 27892/- | सेवा शुल्क, सेवा कर |
| 04 | श्री.अकबर खान अजीज खान (कबाडीपुरा व्यापारी संकुल, कबाडीपुरा) | 13 | 15.00 | 21588/- | सेवा शुल्क, सेवा कर |
| 05 | श्री.मेहबुब खान अजीज खान (कबाडीपुरा व्यापारी संकुल, कबाडीपुरा) | 15 | 21.51 | 30957/- | सेवा शुल्क, सेवा कर |

करीता वरीलप्रमाणे भाडे आकारणी करून तीन वर्षाचे कालावधी करीता दुकाने भाडे तत्वावर (अनामत न घेता) इतर अटी/शर्तीस अधीन राहुन सदर दुकाने तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्यात आली आहेत.

करीता वरीलप्रमाणे बाधित मिळकतधारकाचे / विस्थापितांचे पुनर्वसन दृष्टीने भाडे तत्वावर दुकाने देण्यासंबंधीचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**मा.सभापती : विषय मंजुर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतर्फे रोशन गेट ते आझाद चौक रस्ता रूंदीकरणामध्ये मिळकत बाधित झाल्याने खालील पुर्णपणे विस्थापित झालेले मिळकत धारक यांना त्यांचे उद्योगकरीता पुनर्वसनाच्यादृष्टीने किमान भाडे आकारण्यासंबंधाने 60% सवलत देण्यात येऊन 40% भाडे आकारणी करण्यात आल्यानुसार त्यांना खालीप्रमाणे भाडे सवलत देऊन दुकाने भाडे तत्वावर देण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते.**

| अ.क्र. | नाव | दुकान क्र. | क्षेत्र | भाडे (60% सवलत) | इतर कर |
|---|---|---|---|---|---|
| 01 | श्री.भरत खंडुजी दळवे (पिया व्यापारी संकुल, औरंगपुरा) | 17 | 7.2 | 11056/- | सेवा शुल्क, सेवा कर |
| 02 | श्री.शेख सांडु ताज मोहम्मद (कबाडीपुरा व्यापारी संकुल, कबाडीपुरा) | 7 | 19.38 | 27892/- | सेवा शुल्क, सेवा कर |
| 03 | श्री.साहेब खान अजीज खान (कबाडीपुरा व्यापारी संकुल, कबाडीपुरा) | 8 | 19.38 | 27892/- | सेवा शुल्क, सेवा कर |
| 04 | श्री.अकबर खान अजीज खान (कबाडीपुरा व्यापारी संकुल, कबाडीपुरा) | 13 | 15.00 | 21588/- | सेवा शुल्क, सेवा कर |
| 05 | श्री.मेहबुब खान अजीज खान (कबाडीपुरा व्यापारी संकुल, कबाडीपुरा) | 15 | 21.51 | 30957/- | सेवा शुल्क, सेवा कर |

**तसेच वरीलप्रमाणे भाडे आकारणी करून दुकाने भाडे तत्वावर (अनामत न घेता) इतर अटी/शर्तीस अधीन राहुन सदर दुकाने तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 161 :**

**प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला उस्मानपुरा येथील जुन्या पोलीस चौकीमागील सभागृह हॉल स्पोर्टस् क्लब सार्वजनिक वाचनालय, सांस्कृतिक कार्यक्रम, व्यावसायिक प्रशिक्षण इत्यादीसाठी भाडे तत्वावर मिळावा म्हणुन फ्रेंडस् चॅरिटेबल वेलफेअर ट्रस्ट, औरंगाबाद या संस्थेने मागणी केली आहे. या संदर्भाने या संस्थेस सदर हॉल तीस वर्षासाठी नियमाप्रमाणे भाडे तत्वावर देण्यात यावे म्हणुन मा.सर्वसाधारण सभेने दि.09/08/2012 विषय क्र.849 ने अशासकीय ठराव मंजुर केला आहे. सदर हॉलचे तळमजला +1 असे बांधकाम असून एकुण बांधकाम क्षेत्र 346.54 चौ.मी. एवढे आहे. सदर हॉल सध्या बहुउद्देशीय वापराकरीता स्थानिक नागरीकांना मागणीनुसार लग्न व इतर कार्यक्रमाकरीता भाड्याने देण्यात येतो. तथापी, हॉलचा फारसा वापर होत नाही. करीता संस्थेस संस्थेची मागणी व वर नमूद मा.सर्वसाधारण सभेचा मंजुर ठराव या संबंधाने सदर मंजुर ठराव अंमलबजावणीच्यादृष्टीने या वर्षीचे आर.आर. आधारे या सभागृहाकरीता मासिक भाडे रू.55,200/- प्रतिमाह प्रमाणे भाडे आकारणी करण्यासह देणेसाठी दि.15/12/2012 रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समितीच्या सभेमध्ये हॉल भाडे तत्वावर देणेबाबत संबंधीत संस्थेस वाटाघाटीस बोलावून हॉल भाडे तत्वावर देणेसाठी वाटाघाटी करणेसाठी ठरावास मान्यता झालेली आहे. त्याअनुषंगाने संबंधीत संस्थेस वाटाघाटी करणेसाठी बोलाविले असता संबंधीत संस्थेने रू.6000/- प्रतिमाह भरणा करणेस संमती दर्शविलेली आहे. सदरील वाटाघाटीचे भाड्यास मान्यता होऊन महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीनुसार सदर सभागृह भाडे तत्वावर देणे बाबत करीता प्रस्तावित केल्यानुसार उक्त संस्थेस सभागृह / हॉल तीन वर्षाकरीता भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.**

**मा.सभापती : विषय मंजुर.**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला उस्मानपुरा येथील जुन्या पोलीस चौकीमागील सभागृह हॉल स्पोर्टस् क्लब सार्वजनिक वाचनालय, सांस्कृतिक कार्यक्रम, व्यावसायिक प्रशिक्षण इत्यादीसाठी भाडे तत्वावर देण्यासाठी दि.15/12/2012 रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समितीच्या निर्णयानुसार संबंधीत संस्थेस वाटाघाटी करणेसाठी बोलाविले असता संबंधीत संस्थेने रू.6000/- प्रतिमाह भरणा करणेस संमती दर्शविल्यानुसार महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीनुसार सदर सभागृह रू.6000/- प्रतिमाह भाडे आकारणी करून सदर संस्थेस सभागृह / हॉल तीन वर्षाकरीता भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 162 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मौजे गारखेडा न.भू.क्र.15306/1 वरील समावेशक आरक्षण विकासांतर्गत एकूण बांधकामापैकी 2447.00 चौ.मी. एवढे बांधकाम क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत केले आहे. सदर बांधकाम G + 3 असून यामध्ये एकुण 16 हॉल/दुकाने आहेत. हॉलचे/दुकांनाचे प्रत्येकी क्षेत्र साधारणत: 153.00 चौ.मी. एवढे आहे. सदर हॉल/दुकान वापराकरीता भाडे तत्वावर मिळण्यासाठी शासकीय कार्यालय, संस्था, सेवाभावी संस्था, व्यक्ती यांची मागणी असून तसे अर्ज प्राप्त आहेत.

पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या मजल्यावरील हॉलसाठी शासकीय कार्यालयाची मागणी विचारात घेऊन त्यांना भाडे तत्वावर देण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. दरम्यान तळमजल्याचे चार हॉल/दुकांनाकरीता प्रशासकीय मान्यतेआधारे दि. 07/01/2013 रोजी जाहिर निविदा सूचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या. यामध्ये दि.17/01/2013 पर्यंतच्या निविदा कालावधीत एकही निविदा प्राप्त झाली नाही. तथापी या इमारत बांधकामातील हॉल/दुकानाकरीता मागणी अर्ज प्राप्त आहेत. यामध्ये महानगरपालिकेच्या दरानुसार / सवलतीच्या दरात हॉल/ दुकाने भाडे तत्वावर मिळावेत म्हणुन मागणी आहे. असे विविध संस्था/सेवाभावी संस्था/ व्यक्तींचे अर्ज प्राप्त आहेत.

उक्त हॉल/दुकांनाकरीता फेर निविदा करण्याची कार्यवाही म्हणुन या वर्षीच्या रेडीरेकनर दराआधारे भाडे निश्चित करून होणारे मासिक भाडे रक्कम रू.291/- प्रति चौ.मी. याप्रमाणे होणाऱ्या आधारभूत किमंत गृहीत धरून हॉल/दुकांने भाडे तत्वावर देणे.

तळमजल्याचे हॉल/दुकान भाडे तत्वावर देण्याच्या संदर्भात मा.स्थायी समिती समोर प्रकरणे योग्य त्या निर्णयास्तव सादर करण्याचे मा.आयुक्त महोदय यांनी आदेशीत केले आहे. त्या अनुषंगाने प्राप्त अर्जापैकी रेणुका बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, औरंगाबाद व सचिव, साई सेवाभावी संस्था, गारखेडा, औरंगाबाद यांच्या मागणी संबंधाने सतत पाठपुरावा होत आहे.

करीता वर नमुद केल्याप्रमाणे तळमजल्याचे हॉल/दुकान भाडे तत्वावर देण्याच्या अनुषंगाने योग्य त्या निर्णयासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हळनोर** : या ठिकाणी श्री.प्रविण प्रभाकर वडगांवकर व श्री.किरण विठ्ठल जोशी या दोन व्यक्तींनी हॉल/दुकान मिळण्याची मागणी केलेली आहे. त्यांच्या मागणीनुसार समावेश करण्यात यावा. जे मासिक भाडे आकारण्यात आलेले आहे ते वार्षिक करण्यात यावे.

**श्री.रेणुकादास वैद्य** : 30 वर्षासाठी करण्यात यावे.

**मा.सभापती** : रक्कमेची दुरूस्ती करण्यात यावी. मासिक ऐवजी वार्षिक प्रमाणे भाडे आकारण्यात यावे. स.सदस्य श्री.गिरजाराम हाळनोर यांनी सूचना केल्याप्रमाणे श्री.प्रविण प्रभाकर वडगांवकर, श्री.किरण विठ्ठल जोशी यांचे मागणीनुसार हॉल भाड्याने देण्यात यावे. स.सदस्यांच्या सुचनेप्रमाणे 30 वर्षाकरीता भाडे तत्वावर देण्यात यावे. दुरूस्तीसह प्रस्ताव मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे गारखेडा न.भू.क्र.15306/1 वरील समावेशक आरक्षण विकासांतर्गत महानगरपालिकेस हस्तांतरीत बांधकामातील तळमजल्याचे हॉल/दुकान भाडे तत्वावर मिळण्यासाठी संस्था, सेवाभावी संस्था, व्यक्ती यांचे मागणी अर्जानुसार तळमजल्याचे हॉल/दुकान भाडे तत्वावर देण्याच्या संदर्भात प्राप्त मागणी अर्जानुसार व स.सदस्यांच्या सूचनेप्रमाणे रेणुका बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, औरंगाबाद यांना G-4, श्री.किरण विठ्ठल जोशी यांना G-3, सचिव, साई सेवाभावी संस्था, गारखेडा, औरंगाबाद यांना G-2 आणि श्री.प्रविण प्रभाकर वडगांवकर यांना G-1 याप्रमाणे हॉल/दुकान भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

त्याचप्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे मासिक भाडे आकारण्या ऐवजी वार्षिक भाडे रक्कम रू.291/- प्रति चौ.मी. प्रमाणे आकारण्यात यावे. तीस (30) वर्षासाठी भाडेतत्वावर द्यावे यासह महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीनुसार सभागृहाच्या निर्णयाप्रमाणे तळमजल्याचे हॉल/दुकान भाडे तत्वावर देण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. 163 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे हर्सुल येथील स.नं. 216 व 217 येथील रात्र निवारा जोड रस्त्याचे दुरूस्ती, मजबुतीकरण व डांबरीकरण करणे बाबतच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2011-2012 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये 46,13,900/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2012-2013 या आर्थिक वर्षात नविन खडी रस्ते शहरी भाग या लेखा शिर्षकामधुन करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मंजुरी प्रदान केलेली असून मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्याचे आदेशीत केले आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रूपये 46,13,900/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे हर्सुल येथील स.नं. 216 व 217 येथील रात्र निवारा जोड रस्त्याचे दुरूस्ती, मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.46,13,900/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 164 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.32 कबाडीपुरा येथील (तव्वकल फटाका शॉप जवळील) नाल्यावर आर. सी. सी. पुल बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सा. बां. खात्याचे सन 2011-12 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.36,72,363/- होत आहे. सदरील काम खडी रस्ते व कलव्हर्ट या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दिनांक 21/12/2012 रोजी मा.स्थायी समिती समोर ठेवण्यास मान्यता दिली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.36,72,363/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.32 कबाडीपुरा येथील (तव्वकल फटाका शॉप जवळील) नाल्यावर आर. सी. सी. पुल बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.36,72,363/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 165 :**

कार्यकारी अभियंता वार्ड ई व फ यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.78 येथे विविध ठिकाणी ट्रिमिक्स काँक्रीट रस्ता तयार करणेच्या कामाचे अ.प. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2011-12 दरसुचीनुसार रक्कम रूपये 48,63,348/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2012-2013 या आर्थिक वर्षात नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षकामधुन करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू. 48,63,348/- चा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव व विचारास्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजुर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.78 येथे विविध ठिकाणी ट्रिमिक्स काँक्रीट रस्ता तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 48,63,348/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 166 :

दि.15/12/2012 मा.स्थायी समितीतील चर्चेनुसार संत एकनाथ रंगमंदिर व संत तुकाराम नाट्यगृह सिडको या दोन्ही नाट्यगृहाचे सत्र आरक्षणासाठी जी अनामत रक्कम घेण्यात येते ती प्रत्येक सत्र निहाय घेण्यात येते व सत्र / शो पुर्ण झालेनंतर परत करण्यात येते त्याऐवजी एक रक्कमी अनामत रक्कम घ्यावे. जेणे करून नियमित आरक्षण करणाऱ्या व्यक्ती/संस्था अनामत रक्कम परत घ्या. पुनः पुढील सत्र / शो करीता अनामत रक्कम जमा करणे ही Repeat होणारी कार्यवाही करणेची आवश्यकता होणार नाही / पडणार नाही.

या संबंधाने वर नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावित करण्यात येते की,

1. प्रत्येक नाट्यगृहाकरीता वेगवेगळी अनामत रक्कम रू.50,000/- एक रक्कमी जमा करण्यात येऊन त्यासाठी संबंधीतांना -

अ) संत एकनाथ नाट्यगृह/रंगमंदिर करीता - 10 सत्र / शो

ब) संत तुकाराम नाट्यगृह - 5 सत्र / शो

आरक्षित करता येईल. त्यासाठी पुनः रक्कम जमा करणेची आवश्यकता नाही.

करीता खालील नमूद अटीस अधीन राहुन या प्रकरणी प्रस्तावितास मान्यता होणेस हरकत नाही.

1. वार्षिक डिपॉझिट धारकांने आरक्षित केलेले सत्र इतरांना देऊ / वितरीत करू नये.

2. सत्र / आरक्षण रद्द झाल्यास नियमानुसार तेवढी रक्कम अनामत रक्कमेतून कपात करण्यात येईल किंवा नेहमी होणारी वेगळी रक्कम जमा करावी लागेल.

3. अनामत रक्कमेवर कोणतेही व्याज अथवा याशिवाय इतर सवलत मिळणार नाही ही रक्कम फक्त नाट्यगृह आरक्षणासाठीच राहील. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजुर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दि.15/12/2012 स्थायी समितीतील चर्चेनुसार, संत एकनाथ रंगमंदिर व संत तुकाराम नाट्यगृह सिडको या दोन्ही नाट्यगृहाचे सत्र आरक्षणासाठी एक रक्कमी अनामत रक्कम घेण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यांत येते.

1. प्रत्येक नाट्यगृहाकरीता वेगवेगळी अनामत रक्कम रू.50,000/- एक रक्कमी जमा करण्यात येऊन त्यासाठी संबंधीतांना -

अ) संत एकनाथ नाट्यगृह/रंगमंदिर करीता - 10 सत्र / शो

ब) संत तुकाराम नाट्यगृह - 5 सत्र / शो

आरक्षित करता येईल. त्यासाठी पुन: रक्कम जमा करणेची आवश्यकता नाही.

तसेच खालील नमूद अटीस अधीन राहुन मान्यता देण्यांत येते.

1. वार्षिक डिपॉझिट धारकांने आरक्षित केलेले सत्र इतरांना देऊ / वितरीत करू नये.

2. सत्र / आरक्षण रद्द झाल्यास नियमानुसार तेवढी रक्कम अनामत रक्कमेतून कपात करण्यात येईल किंवा नेहमी होणारी वेगळी रक्कम जमा करावी लागेल.

3. अनामत रक्कमेवर कोणतेही व्याज अथवा याशिवाय इतर सवलत मिळणार नाही ही रक्कम फक्त नाट्यगृह आरक्षणासाठीच राहील. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. 167 :</u>

कार्यकारी अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक या रोडवरील जी.टी.एल. कंपनीचे (मराविवि कंपनीचे) विद्युत खांब व डी.पी. स्थलांतरीत करण्याच्या कामाचे कोटेशन जी.टी.एल. कंपनीतर्फे रू.1,43,02,225/- चे प्राप्त झालेले आहे.

सदरचे काम महानगरपालिकेतर्फे करण्यात येणार असून जी.टी.एल. कंपनीस 1.3% निरिक्षण शुल्काचा भरणा करण्यात येणार आहे. जी.टी.एल. कंपनीच्या प्राप्त कोटेशनच्या दरानुसार दि.29/10/2012 रोजी निविदा मागविण्यात आल्या असता एकमेव निविदा प्राप्त झाली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1) मे. श्री. समर्थ इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजीनियरींग वर्क्स औरंगाबाद यांचे निविदा दर 104.83% जास्त दराने (जी.टी.एल. कंपनीच्या कोटेशनच्या दरानुसार.)

उपरोक्त बाबतीत मे. श्री. समर्थ इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजीनियरींग वर्क्स यांची एकमेव निविदा असल्याने व त्यांनी भरणा केलेले दर जी.टी.एल. कंपनीने दिलेल्या अं. प. दरापेक्षा 104.83% जास्त असल्याने मे. श्री. समर्थ इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजीनियरींग वर्क्स यांना वाटाघाटीसाठी बोलावून जी.टी.एल. कंपनीच्या दरानुसार काम करण्यास विचारणा केली असता मे. श्री. समर्थ इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजीनियरींग वर्क्स औरंगाबाद यांनी जी.टी.एल. कंपनीच्या प्राप्त कोटेशनच्या दरानुसार काम करण्यासाठी लेखी पत्र दिले.

सदर काम जी.टी.एल. कंपनीच्या कोटेशन प्रमाणे केल्यास 1.3% निरीक्षण शुल्क रू.1,84,908/- जी.टी.एल. कंपनीस भरणा करावा लागेल. तसेच जी.टी.एल. कंपनीच्या कोटेशनमध्ये सर्व बाबीचा समावेश करून लेबर चार्जेस, व्हॅट, ट्रान्सपोर्ट, एल.बी.टी. इत्यादीसह जी.टी.एल. कंपनीचे कोटेशन रू.1,60,81,138/- होते.

तरी मे. श्री. समर्थ इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजीनियरींग वर्क्स यांनी मान्य केल्याप्रमाणे जी.टी.एल. कंपनीच्या प्राप्त कोटेशनच्या मान्य दरानुसार (महावितरणच्या मान्यतेनुसार) काम करण्यास मान्यता देणेस्तव तसेच रू.1,60,81,138/- च्या खर्चास मान्यता देणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजुर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक या रोडवरील जी.टी.एल. कंपनीचे (मराविवि कंपनीचे) विद्युत खांब व डी.पी. स्थलांतरीत करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाप्रमाणे निविदाधारक मे. श्री. समर्थ इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजीनियरींग वर्क्स औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे जी.टी.एल. कंपनीच्या प्राप्त कोटेशनच्या दरानुसार काम करण्यास संमती दर्शविल्यानुसार सदरील काम मे. श्री. समर्थ इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजीनियरींग वर्क्स औरंगाबाद यांचेकडून जी.टी.एल. कंपनीच्या प्राप्त कोटेशनच्या मान्य दरानुसार (महावितरणच्या मान्यतेनुसार) काम करून घेण्यास तसेच रू.1,60,81,138/- च्या खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती** : विद्युत विभागातील अधिकाऱ्यांचे अपिल स्थायी समितीसमोर आलेले आहे. अपिल मंजूर करण्यात येतात.

**<u>विषय क्र. 168 :</u>**

जा.क्र.मनपा/मआ/आस्था-1/2012/1129, दिनांक 15/09/2012 रोजीच्या दंडात्मक कार्यवाही करणेच्या कार्यालयीन आदेशाविरूध्द श्री.बनसोडे पी.आर. (उपअभियंता विद्यत),श्री.देशमुख के.डी. (शाखा अभियंता विद्युत),श्री.पालाकुर्तीवार नरेंद्र (विद्युत लाईनमन),श्री.जैस्वाल पी.बी.(विद्युत लाईनमन) व श्री.शेजुळ एस.बी. (विद्युत लाईनमन) यांनी सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.बनसोडे पी.आर. (उपअभियंता विद्यत), श्री.देशमुख के.डी. (शाखा अभियंता विद्युत), श्री.पालाकुर्तीवार नरेंद्र (विद्युत लाईनमन), श्री.जैस्वाल पी.बी. (विद्युत लाईनमन) व श्री.शेजुळ एस.बी. (विद्युत लाईनमन) यांनी स्थायी समिती समोर सादर केलेले अपील मंजूर करण्यात येते.

जा.क्र.मनपा/मआ/आस्था-1/2012/1129, दिनांक 15/09/2012 च्या कार्यालयीन आदेशान्वये केलेली दंडात्मक कार्यवाही रद्द करण्यात येत असून अपिलार्थी अधिकारी, कर्मचाऱ्यांना करण्यात आलेला दंड माफ करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 169 :</u>**

जा.क्र.मनपा/मआ/आस्था-1/2012/257, दिनांक 18/02/2012 रोजीच्या दंडात्मक कार्यवाही करणेच्या कार्यालयीन आदेशाविरूध्द श्री.बनसोडे पी.आर. (उपअभियंता विद्यत), श्री.बनकर आर.एस. (प्र.उप अभियंता विद्युत), श्री.मो.शाकेर (प्र.उप अभियंता विद्युत), श्री.दामोदरे सी.डी. (क.अभियंता विद्युत), श्री.देशमुख के.डी. (शा.अभियंता विद्युत) व श्री.जोशी आर.सी. (विद्युत पर्यवेक्षक) यांनी सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.बनसोडे पी.आर. (उपअभियंता विद्यत), श्री.बनकर आर.एस. (प्र.उप अभियंता विद्युत), श्री.मो.शाकेर (प्र.उप अभियंता विद्युत), श्री.दामोदरे सी.डी. (क.अभियंता विद्युत), श्री.देशमुख के.डी. (शा.अभियंता विद्युत) व श्री.जोशी आर.सी. (विद्युत पर्यवेक्षक) यांनी स्थायी समिती समोर सादर केलेले अपिल मंजूर करण्यांत येते.

जा.क्र.मनपा/मआ/आस्था-1/2012/257, दिनांक 18/02/2012 च्या कार्यालयीन आदेशान्वये केलेली दंडात्मक कार्यवाही रद्द करण्यात येत असून अपिलार्थी अधिकारी, कर्मचाऱ्यांना करण्यात आलेला दंड माफ करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 170 :</u>**

जा.क्र.मनपा/मआ/आस्था-1/2011/249, दिनांक 23/06/2011 रोजीच्या दंडात्मक कार्यवाही करणेच्या कार्यालयीन आदेशाविरूध्द श्री.स.सिकंदर अली (कार्यकारी अभियंता), श्री.बनसोडे पी.आर. (उपअभियंता विद्यत), श्री.देशमुख के.डी. (शा.अभियंता विद्युत), लाईनमन

**श्री.तांबे व श्री.असद अली यांनी सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.स.सिकंदर अली (कार्यकारी अभियंता), श्री.बनसोडे पी.आर. (उपअभियंता विद्यत) व श्री.देशमुख के.डी. (शा.अभियंता विद्युत), लाईनमन श्री.तांबे व श्री.असद अली यांनी स्थायी समिती समोर सादर केलेले अपिल मंजूर करण्यांत येते.**

**जा.क्र.मनपा/मआ/आस्था-1/2011/249, दिनांक 23/06/2011 च्या कार्यालयीन आदेशान्वये केलेली दंडात्मक कार्यवाही रद्द करण्यात येत असून अपिलार्थी अधिकारी, कर्मचारी यांना करण्यात आलेला दंड माफ करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**चर्चा :**

| | |
|---|---|
| **शहर अभियंता** | **:रेल्वेस्टेशन येथील विद्युत पोल आणि डिपीचे काम चालु करण्यात यावे.** |
| **उपअभियंता (विद्युत)** | **:13 डिपी आहेत 64 एलटी पोल आहे एचटी पोल 84 आहेत जीटीएलने 2 कोटीचे कोटेशन दिलेले आहे. 1.3% महानगरपालिकेने काम करण्याचे ठरल्यानंतर दिलेले कोटेशन 1 कोटी 60 लाखाचे आहे. एकच टेंडर आलेले आहे समर्थ इलेक्ट्रीकल्स यांचेतर्फे काम करण्यात येत आहे. कामाचा अनुभव चांगला आहे.** |
| **श्री.समीर राजुरकर** | **:शासन आणि जीटीएलच्या करारामध्ये सदरील काम येत नाही का?** |
| **कार्यकारी अभियंता (विद्युत)** | **:15 कोटी रूपये इन्फ्रासाठी जीटीएलला दिलेले आहेत.** |
| **मा.सभापती** | **:काम तात्काळ सुरू होणार आहे का?** |
| **शहर अभियंता** | **:तात्काळ काम सुरू करण्याचा प्रयत्न करू.** |
| **मा.सभापती** | **:साईडवर सकाळी स्थळभेट देण्यात येईल. पाणीपुरवठा लाईनबाबत खुलासा करण्यात यावा.** |
| **कार्यकारी अभियंता (श्री.कोल्हे)** | **:तपासणी अंती पोल शिफ्टींगचे काम झालेले आहे. मोठे काम असल्याने समांतरमधुन घेण्यात यावे असे ठरलेले आहे.** |
| **मा.सभापती** | **:लाईनमुळे काम थांबणार आहे. रोड खोदुन ठेवलेला आहे. प्रशासनाने याबाबत तात्काळ निर्णय घ्यावा.** |

**याचबरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**